पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १२३**
(सभावृत्तांत)

**दिनांक – १२/०६/२०१९** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार **दि.१२/०६/२०१९** रोजी दुपारी **०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव – सभापती**
२. मा.गावडे राजेंद्र तानाजी
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.ममता विनायक गायकवाड
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.लोंढे नम्रता योगेश
७. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
८. मा.चोंधे आरती सुरेश
९. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
१०. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
११. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
१२. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
१३. मा.कलाटे मयुर पांडूरंग
१४. मा.कलाटे राहुल तानाजी
१५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

या शिवाय मा.पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे - मुख्य लेखा अधिकारी, मा.निकम - सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.राऊत, मा.दांगट – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील - प्राचार्य, औ.प्र.केंद्र, मा.शिंदे - प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण - मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता

YCMH, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.देशमुख, मा.फुटाणे, मा.राणे, मा.वाघुंडे मा.पोरेड्डी - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

**विषय क्र.१८)** मा.स्थायी समिती ठराव क्र.४२३६ दि.२९/०१/२०१९ मध्ये दुरूस्ती करणेबाबत - मा.सागर आंगोळकर, मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.१९)** रूग्णालयाचे बील माफीबाबत - मा.सागर आंगोळकर, मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव

**विषय क्र.२०)** श्री.नागनाथ आण्णा कांबळे, रेडिओ मेकॅनिक इलेक्ट्रिशियन यांचे जन्म दिनांक नोंद दुरूस्तीबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.२१)** भामा आसखेड पाणीपुरवठा प्रकल्पग्रस्त शेतक-यांना पुनर्वसनापोटी रक्कम अदा करणे करिता मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे र.रू.१६.७० कोटी वर्ग करणेबाबत.

**विषय क्र.२२)** अपंग अनाथ वंचित युवक युवतींसाठी निवासी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण प्रकल्प सुरू करणेबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.२३)** मा.स्थायी समिती ठराव क्र.४५६० दि.२८/०२/२०१९ मध्ये दुरूस्ती करणेबाबत - मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.२४)** २०१९ आशिया पॅसिफिक शहरांची आंतरराष्ट्रीय परिषद (२०१९ APCS) दि.०७ ते १० जुलै, २०१९ या कालावधीत ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया येथे होणा-या कार्याक्रमास उपस्थित राहण्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत. – मा.संतोष लोंढे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.२५)** लिपिक पदावरील नियुक्ती रद्द करून गट ड च्या मुळ पदावर पदावनत करून खातेनिहाय चौकशी सुरू केलेल्या कर्मचा-यांचा अपिल अर्ज - मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

**विषय क्र.२६)** श्री.गणेश धोंडिबा राऊत, कनिष्ठ अभियंता यांचा अपिल अर्ज - मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

--------

ठराव क्रमांक - ४८४३
विषय क्रमांक – ०१
दिनांक – १२/०६/२०१९
विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर
अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/१७८/२०१९, दि.२७/०५/२०१९

मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे दैनंदिन कार्यालयीन वापराकरिता टाटा मोटर्स लिमिटेड यांचे Zonal Office West Zone मार्फत Government E-Marketplace या पोर्टलवरील Tata Tigor XZ+ या वाहनाचे र.रु.५,७२,९८७/- (अक्षरी र.रु.पाच लाख बहात्तर हजार नऊशे सत्याऐंशी फक्त) या प्राप्त दरपत्रकानुसार नविन वाहन खरेदी करणेस तसेच संबंधितास सदरची रक्कम आगाऊ स्वरुपात अदा करणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८४४
विषय क्रमांक – ०२
दिनांक – १२/०६/२०१९
विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.प्रज्ञा खानोलकर
अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.डक्षे/८/कावि/१४२/२०१९ दि.२४/०४/२०१९

मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व कचरा कुंड्या, रस्त्याचे, गटर्सच्या कडेचे कच-याचे ढीग, मोकळ्या जागेतील कच-याचे ढीग उचलणे व त्याची वाहतुक करुन भोसरी स्थानांतर केंद्र अथवा मोशी कचरा डेपो येथे टाकणे या कामासाठी निविदा नोटीस क्र.५/२०१५-१६ अन्वये आरोग्य विभाग ड क्षेत्रिय कार्यालया मार्फत निविदा प्रसिध्द करुन कामाचे दर मागविणेत आले होते. त्यानुसार मे. जयगणेश एंटरप्रायजेस यांचे दर मान्य करुन कामाचे आदेश देणेत आलेले होते. सदर कामाची मुदत दि.३१/०३/२०१९ रोजी संपत आहे व दि.०१/०४/२०१९ पासुन सदर कामाची आवश्यकता आहे. प्रस्तावात नमुद प्रमाणे ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कचरा उचलणे व वाहतुक करणे या कामासाठी दि.१५/१०/२०१६ रोजी करणेत आलेला सिलबंद करारनाम्यातील अटी शर्ती कायम ठेवून दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०५/२०१९ अखेर अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी यापैकी प्रथम येणा-या कालावधी पर्यंत मे.जयगणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगांव यांनी भोसरी कचरा स्थानांतर केंद्रासाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४,२५०/- व मोशी कचरा डोपोसाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४,४५०/- या दराने एकुण १४ टिपर/ट्रक वाहने पुरविणेस व याकामी अंदाजीत अपेक्षीत र.रु.४०,००,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त) या येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ४८४५ | विषय क्रमांक – ०३
दिनांक – १२/०६/२०१९ | विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभा/१५/कावि/२११/२०१९ दि.२९/०५/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग यांचेसाठी शालेय बेंचेस खरेदीसाठी Government e marketplace वर प्रसिद्ध केलेल्या निविदा क्रमांक GEM/2019/B/184852 नुसार ०२ पात्र निविदाकारांपैकी मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस यांचे लहान लोखंडी बेंचेसचे दर र.रु.४,८९६/- प्रति नग व मोठे लोखंडी बेंचेसचे दर र.रु.४,९५०/- प्रति नग असे एकूण ११६० नग बेंचेसचे प्राप्त झालेले दर र.रू.५६,९६,६४०/- हे अंदाजपत्रकिय दर र.रु.७१,४०,०००/- पेक्षा २०.२१% कमी व लघुत्तम आहेत. सदरचे दर स्विकृत करणेत आलेले असून र.रु.५६,९६,६४०/- (अक्षरी र.रु.छपन्न लाख शहान्नव हजार सहाशे चाळीस फक्त) चे खर्चास व मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८४६ | विषय क्रमांक – ०४
दिनांक – १२/०६/२०१९ | विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.प्रज्ञा खानोलकर | अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.आमुका/९/कावि/१७०/२०१९ दि.३०/०५/२०१९

मा.अति. आयुक्त(२) यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत क्षेत्रीय कार्यालय स्तरावर रस्ते/ गटर्स साफसफाई कामासाठी किमान वेतन दराने कामगार पुरविणे करीता ई-निविदा नोटीस क्र.३/२०१७-१८ अन्वये निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी पात्र ठरलेल्या ७ संस्थांकडून २ वर्ष कालावधीसाठी एकूण १५२९ कामगार उपलब्ध करून दिलेले आहे तसेच कामगारांचे वेतन किमान वेतन दराने अदा करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.१०१२ दिनांक १९/०९/२०१७ अन्वये मान्यता देणेत आली आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे “ग” क्षेत्रीय कार्यालयाकडील ३ संस्थांकडून एकूण ९६ कामगार उपलब्ध करुन दिलेले आहेत. यापैकी मे.सिध्दीविनायक एंटरप्रायजेस यांचेकडून ५२ कामगारांकडून रस्ते, गटर्सची साफसफाई करण्यात येत आहे, मे. शुभम उद्योग यांचेकडून ३१ कामगारांकडून रस्ते,गटर्सची साफसफाई करण्यात येत आहे. तसेच मे.गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचेकडून १२ कामगारांकडून रस्ते, गटर्सची साफसफाई करण्यात येत आहे. मा. अति. आयुक्त (२) यांचेकडील दिनांक १९/०३/२०१९ रोजीचे मान्य प्रस्तावानुसार “ग” क्षेत्रीय कार्यालयाकडील दैनंदिन रस्ते साफसफाई कामासाठी मे.शुभम उद्योग यांचेकडून ५० कर्मचारी दि.०१/०४/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ अखेर ३ महिने कालावधीकरीता किमान वेतन दराने उपलब्ध करुन घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास र.रु.२५,०५,६८३/-

(अक्षरी र.रु.पंचवीस लाख पाच हजार सहाशे त्र्याऐंशी फक्त) किंवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेची मा.अति.आयुक्त (२) यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामासाठी येणा-या र.रू.२५,०५,६८३/- (अक्षरी र.रू.पंचवीस लाख पाच हजार सहाशे त्र्याऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८४७ विषय क्रमांक – ०५
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.संतोष लोंढे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.डक्षे/३/कावि/१७७/२०१९ दि.३०/०५/२०१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या कार्यक्षेत्रातुन वाहणा-या पवना व मुळा नदीपात्रातील हायसिंथ, पानगवत, प्लॉस्टीक व कचरा काढणेचे काम यांत्रिक पध्दतीने व मनुष्यबळाव्दारे काढणेचा ठेका मे.साई फ्राईट प्रा.लि. मुंबई, यांना दि.१०/०५/२०१७ पासुन आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील पत्र क्र आ.मु.का./४/कावि/२४२/२०१७, दि.९/५/२०१७ अन्वये १ वर्ष कालावधीसाठी देणेत आलेला आहे. संस्थेच्या करारनाम्यातील अट क्रं ३ नुसार सदर ठेकेदारांनी आदेशाच्या कालावधीपासुन ४५ दिवसात जलपर्णी काढणेचे काम पुर्ण करावयाचे होते व उर्वरीत कालावधीत नदीपात्रात कामाचे कालावधीमध्ये जलपर्णी, निर्माल्य, किना-यावरील वाढलेले पान गवत व कचरा पुर्णपणे काढुन नदीपात्र कायमस्वरुपी स्वच्छ ठेवणेची जबाबदारी सदर संस्थेची होती. परंतु मे.साई फ्राईट प्रा.लि. यांनी केलेल्या कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा घेतला असता जलपर्णी काढणेचे कामकाज समाधानकारक होत नसल्याने तसेच काही ठिकाणी काम न केलेचे नागरीकांच्या तक्रारीत वाढ झाल्याने मा.अतिरीक्त आयुक्त यांचे आदेशानुसार थेट/खाजगी पध्दतीने पवना व मुळा नदीपात्रातील जलपर्णी काढणेकामी र.रु.४,००,०००/- अग्रीम मंजुर करण्यात आले होते. सदर मंजुर र.रु.४,००,०००/- अग्रीम पैकी र.रु.२,००,०००/- रक्कमेचा धनादेश सहा. आरोग्याधिकारी यांचे नावे काढुन अग्रीम अदा करण्यात आली होती. घेतलेल्या र.रु.२,००,०००/- पैकी जलपर्णी काढणेकामी सहा. आरोग्याधिकारी यांचेकडील अहवालानुसार दि.१५/०६/२०१८ ते ०९/०७/२०१८ अखेर एकुण १११ मजुर प्रति दिन प्रति मजुर र.रु.४४८/- प्रमाणे कामाला लावुन कामकाज करुन घेण्यात आलेले असुन याकामी एकुण र.रु.४९,७२८/- इतका खर्च झाला असुन उर्वरीत र.रु.१,५०,२७२/- पावती क्र C/९१३ दि.१७/०९/२०१८ रोजी मनपा कोषागारात जमा केलेले आहे. सबब मंजुर अग्रीम र.रु.४,००,०००/- पैकी अदा केलेली अग्रीम र.रु.२,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८४८ विषय क्रमांक – ०६
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग– माहिती व तंत्रज्ञान CSR कक्ष
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.JNNURM/३/कावि/१३२/२०१९ दि.०४/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये केंद्र शासनाचे धोरणानुसार CSR Activity राबविणेसाठी तत्कालीन आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली दि.१८/११/२०१६ रोजी घेणेत आलेल्या सभेमध्ये CSR Expert सल्लागार मानधनावर नेमणेकामी निर्णय झाला आहे तसेच सदर CSR Expert सल्लागार नेमणेकामी र.रू.७०,०००/- मानधन निश्चित करणेकामी प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. सदर CSR Expert सल्लागार नेमणेकरीता MBA CSR पदवीका प्राप्त अथवा MBA शिक्षण पुर्ण, CSR विषयक अनुभवासह अशी शैक्षणिक अर्हता ठरविणेत आलेली होती. यापुर्वी CSR कक्षाकडून जाहिरात प्रसिध्द करुन निवड प्रक्रिया राबवून श्री.विजय वावरे CSR सल्लगार यांची एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरिता नेमणूक करणेत आली होती त्यांची मुदत दि.१० डिसेंबर, २०१८ रोजी पुर्ण झाल्यानंतर दि.११ जानेवारी, २०१९ पासून ५ महिने कालावधी करिता मुदतवाढ देण्यात आली असून त्यांची मुदत दि.१० जून, २०१९ रोजी पुर्ण होत असलेने यापुर्वी मुदतवाढ दिलेले श्री.विजय वावरे एम.ए. सामाजिक शास्त्र यांना CSR Expert सल्लागार म्हणून र.रू.७०,०००/- (अक्षरी र.रू.सत्तर हजार फक्त) प्रति महा एकत्रित मानधनावर १ दिवस सेवा खंडित करून दि.१२ जून, २०१९ पासून पुढील २ महिने किंवा नव्याने नियुक्त होणारे CSR Expert सल्लागार यांना नियुक्ती आदेश देणेपर्यंतच्या कालावधी करिता यापैकी जे प्रथम घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८४९ विषय क्रमांक – ०७
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग– नगररचना व विकास
सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/रहाटणी/८/१५५/१९ दि.०४/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडील सर्व्हे विषयक विविध कामे करणेसाठी सर्वेक्षक सल्लागारांचे (Surveyor Consultant) पॅनल नेमणेकामी ई निविदा नोटीस क्र.Town Planning/86/1/2018-19 निविदा नोटीस दि.०३।०२।२०१९ रोजी दै.पुढारी, दै.सामना, दै.लोकसत्ता, दै.नवभारत या वृत्तपत्रामध्ये व ई निविदा Maharashtra tenders चे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच सदरकामी निविदा पूर्व सभा दि.११।०२।२०१९ रोजी घेण्यात आलेली आहे. सदरची ई-निविदा दि.२२।०२।२०१९ रोजी उघडण्यात आली असून एकुण ९ निविदाकारांनी त्यांची माहीती सादर केलेली आहे. सर्व्हेक्षण कामासाठी सल्लागार सर्व्हेक्षकांचे पॅनल तयार करणेकामी

प्रसिध्द केलेल्या या निविदेतील पात्रता निकष, अनुभव, वार्षिक उलाढाल इ. बाबींसाठी निविदा प्राप्त एजन्सींनी सादर केलेल्या माहीतीची पडताळणी केली असता एकुण ९ सल्लागारांपैकी खालीलप्रमाणे ७ सल्लागार पात्र ठरत आहेत.

१. मनोज देशपांडे कंन्स्लटन्ट फ्लॅट नं.१०, ए-विंग श्रीदत्त सोसा. मानिक बिल्डींग वडगाव, पुणे-५१

२. सनकॉन इजिंनिअर्स प्रा. लि. पी- १।९, साई पॅलेसजवळ लोहीया जैन आयटीपार्क, भुसारी कॉलनी, कोथरुड पुणे-३८,

३. ग्राफीकॅड सिस्टींम्स् फ्लॅट नं१, पुनित यश आर्किड, २ मजला, कर्वे रोड, कोथरुड, पुणे.

४. एच.टी.जाधव अँण्ड असोसिएटस्, जलसंपदा, जाधव फार्म, टाकळी रोड, नाशिक.

५. द निसर्ग कंन्स्लटन्सी, डी-१५, २ रा मजला ,सेठीज सिटी प्लाझा गडकरी चौक, नाशिक.

६. ध्रुव कन्सलटन्सी सर्व्हिस लि. ५०१, ५ वा मजला, फ्लॅट नं.६७, पुजित प्लाझा, पाल्म बिच रोड, सीबीडी, बेलापुर नवी मुंबई.

७. पायोनिअर फाऊडेशन इंजिनिअर्स प्रा. लि. ४०३, अभिमान-२, हात्ती नाका, ठाणे.

तरी पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडील सर्वेक्षण कामासाठी "सर्वेक्षक सल्लागार" (Survey Consultant) म्हणून या ७ सल्लागारांची नेमणूक ३ वर्षासाठी मनपा पॅनेलवर नेमणूक देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ४८५० | विषय क्रमांक – ०८ |
| दिनांक – १२/०६/२०१९ | विभाग– आरोग्य मुख्य कार्यालय |
| सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.संतोष लोंढे |

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आमुका/३/कावि/३०९/२०१९ दि.०४/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार घरोघरचा कचरा गोळा करुन मोशी कचरा डेपो येथे वाहतुक करुन टाकणेकामी "ब", "क" व इ प्रभाग कार्यक्षेत्रातील या कामासाठी व अ, फ व ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कचरा उचलणे व मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणेचे (सेकंडरी कलेक्शन) व अ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र.१४ व १७ मध्ये ३ टिपर वाहने व प्रभाग क्र.१८ व १९ मध्ये २ कॉम्पॅक्टर वाहने घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे (प्रायमरी व सेकंडरी) या कामासाठी मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. या संस्थेस देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा.आयुक्तसो यांचे दि.०१/०२/२०१९ रोजीचे मान्य प्रस्तावान्वये अ,फ,ग क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील कचरा वाहतूक करणे (सेकंडरी वाहतूक) याकामासाठी दि.०१/०१/२०१९ पासून कॉम्पॅक्टर या वाहनाकरिता प्रति मे.टन र.रु.७३७.४६ व ट्रक या वाहनाकरिता प्रति मे.टन र.रु.८८५.२३ याप्रमाणे दर देणेकामी मान्यता दिलेली आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०३/२०१९ रोजी संपुष्टात आलेली असता आरोग्य विषयक कामाकरीता असलेली आवश्यकता विचारात घेवून दि.१२/०४/२०१९ रोजीचे प्रस्तावान्वये सदर कामाचे खर्चास मा.स्थायी समितीची कार्योत्तर

मान्यता घेणेकामी मा.आयुक्तसो यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामास २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ व त्यास येणा-या खर्चाच्या मान्यतेकामी या कार्यालयामार्फत विषय पत्र क्र.आमुका/३/कावि/२८९/२०१९ दि.१६/०५/२०१९ रोजी मा.स्थायी समितीसमोर सदरचा विषय ठेवण्यात आलेला आहे. दरम्यान मा. स्थायी समिती सभागृहामध्ये झालेल्या दि.२८/०५/२०१९ रोजीचे बैठकीमध्ये मे. ए.जी. एन्वायरो व मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. यांच्याकडील नवीन गाड्यांचे आर.टी.ओ. पासिंग चे कामकाज राहिल्यामुळे घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे कामाची नि.नो.क्र.१०/२०१७-१८ व नि.नो.क्र.११/२०१७-१८ या निविदांचे कामकाज आम्ही दि.०१/०७/२०१९ पासून सुरु करु अशी विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., यांना पुन्हा १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि.यांची ठेकेदार म्हणून दि.०१/०६/२०१९ते दि.३०/०६/२०१९ अखेर अथवा नवीन ठेकेदारांमार्फत कामकाज सुरु होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.१,३६,७२,५९५/- (अक्षरी र.रु. एक कोटी छत्तीस लाख बाहत्तर हजार पाचशे पंच्यान्नव फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८५१ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/५/कावि/१४८/२०१९ दि.२९/०५/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालय तर्फे “बांधकाम साहित्य व राडारोडा यांच्यातील टाकाऊ घटकाच्या विल्हेवाट लावणे” या नियम २०१६ नुसार [C & D Waste Management Rule 2016] महानगरपालिकेने व्यवस्थापकाची जबाबदारी पार पाडावयाची आहे. पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालयच्या नियमांनुसार महानगरपालिकेने सदर यंत्रणेसाठी उपविधी [By laws] मंजूर करून सदर व्यवस्थापन खर्च राडारोडा निर्माण कर्त्याकडून वसूल करणे प्रस्तावित आहे. तसेच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरूनबांधकाम राडारोडयाचा पुर्नवापर करण्याच्या व टाकाऊ वस्तूचे प्रमाण कमी करण्या-या बांधकाम व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी सवलती व सूट देणे याकरिता महानगरपालिकेतर्फे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

**पूर्वपिठीका:** भारत देशातील बांधकाम व्यवसायाच्या वृद्धी दर वार्षिक ७-८ टक्के आहे. पुढील वर्षात नीती आयोगाच्या अनुमानानुसार सध्याच्या बांधकामाच्या तिप्पट गृहनिर्माण प्रकल्प, रस्ते, व्यावसायिक व संस्थात्मक आस्थापना व मुलभूत सुविधा प्रकल्प भारतात प्रस्तावित आहेत. या प्रकल्पातून वाळू, खडी, दगड, चुनखडी, माती यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. या प्रकल्पाच्या बांधकाम साहित्यातून निर्माण होणा-या राडारोड्यातून अनेक संसाधानाचे

वर्गीकरण करून पुर्नवापर केला जाऊ शकतो. यासाठी दिल्ली व अहमदाबाद येथे पथदर्शी प्रकल्प गेली ५ ते ६ वर्षापासून कार्यरत आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील व आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकाम प्रकल्प कार्यरत आहेत. शहरांतर्गत अनेक विकास प्रकल्पाचे बांधकाम शासन व महानगरपालिकेतर्फे व खाजगी स्वरुपात केले जात आहेत. शहरातील मध्यम वर्गामध्ये सातत्याने गृह दुरुस्ती करिता व सुधारणा करिता घराअंतर्गत बांधकाम साहित्यांचा वापर होत आहे. सद्यस्थितीत शहरात सदर टाकाऊ बांधकाम साहित्य नदी, नाले, ओढे, तळे इत्यादींच्या काठावर व इतर ठिकाणी अयोग्य पद्धतीने टाकण्यात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक स्त्रोतांचे प्रदूषण होत आहे. तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्यामुळे नागरिकांना त्याचा त्रास होऊन अनारोग्य परिस्थिती निर्माण होते.

**उद्दिष्ट:** Construction and Demolition Waste Management Rule 2016 नुसार शहरात निर्माण होणा-या बांधकामाचा राडारोडा सुयोग्य पद्धतीने गोळा करून त्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे. शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रियेतून वेगळ्या झालेल्या बांधकाम संसाधानाचा पुर्नवापर महानगरपालिकेतर्फे केल्या जाणा-या बांधकाम प्रकल्पामध्ये करणे तसेच खाजगी प्रकल्पामध्ये सदर साहित्याचा पुर्नवापर करणेसाठी प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे.

**कृती आराखडा:** १. शहरातील बांधकाम साहित्य वापर करण्या-या सर्व व्यावसायिक कंत्राटदार व नागरिक यांना पर्यावरण मंत्रालयातर्फे बांधकाम व दुरूस्ती निष्कासनातून निर्माण होणा-या राडारोड्याच्या महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम अंतर्गत भाग १८ तील २९०,२९१,२९२,२९३ नियम बंधनकारक असतील. २. बांधकाम व दुरूस्ती मधून निर्माण होणा-या राडारोडा व्यवस्थापनासाठी राडारोडा निर्मितीदारचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

**श्रेणी क्र.१** : i शासनाच्या व महानगरपालिकेतर्फे नेमणूक केलेले कंत्राटदारामार्फत विविध विकास कामातून निर्माण होणारा राडारोडा. : ii खाजगी बांधकाम व्यावसायिक, संस्था व नागरिकांकडून करणेत येणारी बांधकामे ज्यांना महानगरपालिकेतर्फे खाजगी बांधकामासाठी प्राधिकृत वा परवानगी वितरीत बांधकामातून निर्माण होणारा राडारोडा. **श्रेणी क्र.२** : i शासनाची व महानगरपालिकेची परवानगी आवश्यक नसलेले कोणतीही घरगुती आस्थापना अंतर्गत, संस्था अंतर्गत बांधकाम व दुरुस्ती श्रेणी १ मध्ये अंतर्गत समाविष्ट नसलेले सर्व घटक : ii मनपा किंवा कोणत्याही प्राधिका-याकडून परवानगी न घेता करणेत येणा-या बांधकामामधून निर्माण होणारा राडारोडा.

**श्रेणी क्र.१ अंतर्गत येणा-या घटकांनी पुढील प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित असेल.**

१. शासकीय/ निमशासकीय विभागाच्या विविध विभागामार्फत किंवा महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून कार्यादेश वितरीत झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत अथवा आपत्कालीन

परिस्थितीत काम सुरु केल्यानंतर तीन दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाकडे कामाचे स्वरूपानुसार निर्माण होणारे राडारोडाच्या अंदाजित प्रमाण व प्रकार कामाचे ठिकाण विहित नमुन्यात शासकीय/ निमशासकीय किंवा मनपाच्या संबधीत विभागाच्या कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिकां-यांकडून प्रमाणित करून सादर करावे. सदर राडारोडा ५०० किलोपेक्षा जास्त असल्यास आवश्यक कंटेनरची संख्या निश्चित करून अंदाजित प्रक्रिया व वाहतूक खर्च तसेच महानगरपालिकेतर्फे साठवणूक कंटेनरसाठी आवश्यक ठेव रक्कम निश्चित करण्यात येईल.

२. राडारोडाचे दैनिक प्रमाण जास्त नसल्यास निर्मितीदार स्वतःचे कंटेनर वापरू शकतात व महानगरपालिकेच्या कॉल सेंटर मधिल यंत्रणाना राडारोडा उचलण्यासाठी संपर्क करू शकतात. महानगरपालिकेच्या यंत्रणांना टोल फ्रि क्रमांकावर राडारोडा उचलण्यासाठी संपर्क केल्यानंतर त्वरीत राडारोडा उचलण्याची व्यवस्था मनपाने नेमलेल्या कंपनीतर्फे करेल परंतु कोणत्याही परिस्थितीत राडारोडा नैसर्गिक जमिनीवर किंवा रस्त्यावर व इतरत्र टाकता येणार नाही याची जबाबदारी सबंधित संस्थावर व नागरिकांवर राहील.

३. अंदाजित प्रक्रीया खर्चाच्या कमीत कमी २५ टक्के रक्कम व साठवणूक कंटेनरकरिता ठेव रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल. श्रेणी १ मध्ये येणा-या महानगरपालिकेच्या कंत्राटदाराच्यावतीने संबधित विभागाचे अधिकारी विभागाचा Login व Password वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात.

४. सध्या अस्तिवात असलेल्या राडारोडाच्या व अनाधिकृत बांधकामाच्या राडारोड्याच्या वहनासाठी व प्रक्रिया करण्यासाठी प्रभाग प्रमुखांना Login व Password वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात. या करिता छायाचित्र सहित केलेली कार्यवाही व राडारोडा अंदाजित प्रमाण यांची नोंद करणे आवश्यक असेल.

५. महानगरपालिकेतर्फे राडारोडा व्यवस्थापनासाठी निर्माण करण्यात येणा-या मोबाईल अॅप व संकेतस्थळामध्ये Login व Password संबधित संस्था यांना अग्रीम रक्कम जमा झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

६. सदर अॅप व संकेत स्थळावर अंदाजित राडारोडाचे प्रमाण व जमा अग्रिम रक्कम खात्यामध्ये दिसेल.

७. सदर संस्थाने कंटेनर भरल्यानंतर अथवा सदर संस्थेने संपर्क केल्यानंतर राडारोडा उचलण्यासाठी वाहन पाठविले जाईल. सदर वाहनातील संगणक यंत्रणेव्दारे उचलण्यात आलेला राडारोडा त्याचे छायाचित्र व त्यांचे वजन तसेच सदर साठी आकारण्यात येणारी रक्कम महानगरपालिकेच्या समन्वय कक्षाकडे व मोबाईल अॅप वर दोन्ही कडून नोंदवण्यात येईल व अग्रिम रक्कमेतून वजावट करण्यात येईल.

८. राडारोडा उचलण्यात येण्यासाठी मोबाईल ॲपमधील शिल्लक रक्कम हि अंदाजित प्रमाणाच्या ५% पेक्षा जास्त असणे आवश्यक राहील. ९. सदर रक्कम ५% पेक्षा कमी असल्यास सदर संस्थेने तात्काळ पुढील २५% टक्के भरणा करणे आवश्यक राहील.

**श्रेणी २ अंतर्गत येणा-या घटकांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.**

१. श्रेणी २ अंतर्गत घटकांनी जमा झालेला राडारोडा, गनी बॅगमध्ये भरणे आवश्यक राहील. श्रेणी २ अंतर्गत सदर राडारोडा महानगरपालिकेच्या मोशी येथील Construction & Demolition पर्यंत स्वखर्चाने नेऊन देऊ शकतात. अथवा महानगरपालिकेच्या राडारोडा व्यवस्थापन केंद्रास टोल फ्रि क्रमांकावर संपर्क करून राडारोड्यासाठी वाहन Pickup साठी बोलवू शकतात.

२. राडारोडा मनपाच्या नजीकच्या ट्रान्स्फर स्टेशन पर्यंत नेल्यास श्रेणी १ व२ मधील घटकांना ट्रान्स्फर स्टेशन येथे वजनाप्रमाणे शुल्क भरणा करावा लागेल. सर्व श्रेणीसाठी पुढीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन शुल्क आकारणे प्रस्तावित आहे. राडारोडा गोळा करणे. श्रेणी १ व २ बांधकाम राडारोडा उचलणे व मोशी राडारोडा प्रक्रिया केंद्रापर्यंत वहन खर्च र.रु.१५/- प्रति किमी/प्रतिटन राडारोड्यावर प्रक्रिया करणे. श्रेणी १ व २ बांधकामराडारोडा प्रक्रिया शुल्क. रक्कम रुपये. २५०/- प्रति  टन

**नियम बाह्य राडारोडा व्यवस्थापनाकरिता दंड :-**

१. वरीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन यंत्रणाशी संपर्क न करता अथवा अनधिकृत राडारोडा टाकणा-या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक, कंत्राटदार, नागरिक व इतर घटकावर टाकलेल्या राडारोडाच्या वाहनासाठी व प्रक्रियेसाठी येणा-या खर्चाच्या १० पट शुल्क अधिक वहन व प्रक्रिया खर्च वसूल करण्यात येईल. तसेच नागरी घनकचरा व्यवस्थापन २०१६ व C & D Waste Management Rule 2016 च्या अधिनियमनुसार कार्यवाहीस पात्र राहतील.

२. वरीलप्रमाणे कोणत्याही श्रेणीमधील घटकाने नैसर्गिक, नदी, नाले, ओढे, इत्यादी जलस्त्रोतांच्या बाजूने विनापरवाना राडारोडा टाकलेचे निदर्शनास आल्यास, तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून १० पट दंडाची रक्कम तसेच त्यांचेवर फौजदारी गुन्हा मनपाच्या वतीने दाखल करणेत येईल.

**राडारोडा पासून पुनर्निर्मित घटकाच्या वापरास प्रोत्साहन :-**

१. (i) प्रक्रियायुक्त राडारोडा वापरणा-या बांधकाम व्यवसायिकांना प्रोत्साहन देण्याकरिता बांधकाममध्ये ग्रीन बिल्डींग रेटींग अंतर्गत GRIHA किंवा LEED प्रमाणपत्र घेणा-या बांधकाम प्रकल्पांना मालमत्ता करामध्ये प्रचलित नियमानूसार जास्तीत जास्त ५% सूट तसेच मोठ्या

प्रकल्पामध्ये (Large Development) अथवा परवडणा-या (Affordable Housing) (GRIHA) गृहा मानांकननुसार प्रकल्पामध्ये चार स्टार व पाच स्टार प्रकल्पामध्ये गृह प्रमाणपत्र अथवा (Leed) लीड प्रमाणपत्रामध्ये Platinum अथवा गोल्ड दर्जा प्रमाणपत्र मिळवलेल्या प्रकल्पांना मनपाच्या बांधकाम परवानगी विभागाकडील ग्रीन बिल्डींग रेटींगच्या योजनेनूसार प्रचलित सुट देय राहील.

(ii) प्रक्रियायुक्त राडारोड्यापासून निर्माण झालेल्या बांधकाम साहित्याचा मोठ्या प्रमाणात वापर करणा-या बांधकाम व्यवसायिक किंवा, खाजगी नागरिकांना तसेच शासकीय /निमशासकीय/मनपाच्या ठेकेदारांना सदरचे साहित्य त्या-त्या वर्षाच्या चालू बाजारभावापेक्षा २०% कमी दराने उपलब्ध करुन देणे सबंधित एजन्सींवर बंधनकारक राहील.

२. महानगरपालिकेतर्फे करण्यात येणा-या सर्व स्थापत्य, कामामध्ये राडारोड्यावर प्रक्रिया करून बनविलेल्या बांधकाम साहित्याचा वापर M२० grade पर्यंत Non structural भागासाठी वापर करणे बंधनकारक राहील त्यासाठी मनपाच्या शहर अभियंता कार्यालयाने आवश्यक साहित्याची मागणी प्रक्रिया केंद्राला तीन महिने आगाऊ पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे माध्यमातून कळविणे आवश्यक आहे. सदर स्थापत्य विषयक बाबींचे प्रत्येक वर्षीचे दर, स्थापत्य विभागामार्फत शहर अभियंता कार्यालयाकडून दरपृथ्थकरणाव्दारे निश्चित करणेत येतील. तसेच बाजार भावातील अशाच बाबींच्या दरापेक्षा सुमारे २०% कमी दराने सदरचे साहित्य मनपाच्या विविध विकास कामासाठी उपलब्ध करुन देणे सबंधित एजन्सीवर बंधनकारक राहील. त्याचा वापर मनपाच्या विविध विकास कामामध्ये आवश्यकतेनूसार करणेची दक्षता स्थापत्य/उद्यान/ड्रेनेज/पाणीपुरवठा इत्यादी विभागांकडून घेणेसाठी अशा बाबींचा समावेश निविदेमध्ये स्वतंत्रपणे करणेत येईल.

३. यामध्ये प्रामुख्याने पेव्हर ब्लॉक, कर्ब स्टोन, चेंबर्स कव्हर, ट्रि गार्ड, युटीलीटी डक्ट व इतर आवश्यकते प्रमाणे निर्माण होऊ शकणारे नाविन्यपूर्ण प्रिकास्ट प्रॉडक्टसचा समावेश असेल. या व्यतिरिक्त विविध विकास कामांसाठी लागणारे कच्चे साहित्य उदा. दगड, खडी, विटा, वाळू, माती इत्यादी सह रस्त्यासाठी लागणारा भराव, GSB, Wet - Mix इत्यादी विविध बांधकाम साहीत्याचा वापर मनपाच्या विविध विभागाकडील ठेकेदारांमार्फत करणेसाठीची कार्यप्रणाली शहर अभियंता कार्यालयाकडून निश्चित करणेत येईल. त्यानुसार याचा वापर मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील निर्माण होणा-या बांधकामाच्या राडारोड्याचे Construction and Demolition Waste Management Rule 2016 चे नियमानूसार वहन करुन त्याचेवर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन त्यापासून निर्माण होणा-या विविध Precast Product बांधकाम साहित्याचा पूर्ण वापर मनपाच्या व इतर खाजगी बांधकामामध्ये करणेच्या धोरणास [C & D Waste Policy] मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम

होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८५२ विषय क्रमांक – १०

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/१२९/२०१९ दि.०६/०६/२०१९

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.84/4/2018-19 अन्वये प्रभाग क्र.२ मध्ये मनपाचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम व क्रिडा विभागामार्फत भरवण्यात येणा-या स्पर्धासाठी मंडप व्यवस्था करणेकामी मे.लालदिप कन्स्ट्रक्शन नि.र.रू.41,47,596/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस लाख सत्तेचाळीस हजार पाचशे शहान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.41,47,596/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत.त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.41,47,596/- पेक्षा 16.20% कमी म्हणजेच र.रु.34,75,685/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- एकुण र.रु.34,75,685/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८५३ विषय क्रमांक – ११

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/१३०/२०१९ दि.०६/०६/२०१९

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.84/5/2018-19 अन्वये प्रभाग क्र.२ विविध रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.श्रीगणेश कन्स्ट्रक्शन नि.र.रू.31,20,379/- (अक्षरी र.रु. एकतीस लाख वीस हजार तीनशे एकोणसत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.30,40,878/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.30,40,878/- पेक्षा 24.60% कमी म्हणजेच र.रु.22,92,822/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.10,601/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.68,900/- = एकुण र.रु.23,72,323/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित

केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामाकरुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८५४ विषय क्रमांक – १२
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – स्थापत्य BRTS
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/BRTS/१९१/२०१९ दि.०६/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.83/02/2018-2019 अन्वये प्रजिमा - 31 या रस्त्यावरील विविध सेवावाहिन्यांसाठी खोदलेला रस्ता व पदपथ यांचे चर पूर्ववत करणेकामी मे.श्रीगणेश कन्स्ट्रक्शन नि.र.रू.63,54,481/- (अक्षरी र.रु.त्रेसष्ठ लाख चोपन्न हजार चारशे एक्क्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.62,66,831/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.62,66,831/- पेक्षा 23.70% कमी म्हणजेच र.रु.47,81,592/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.87,650/- = एकुण र.रु.48,69,242/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८५५ विषय क्रमांक – १३
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.माध्य/शि/४/कावि/३२०/२०१९ दि.०६/०६/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत १८ माध्यमिक विद्यालय कार्यरत असून सदर विद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता द इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ लायन्स क्लब्ज च्या वतीने प्राध्यापक श्रीम.शैलेजा सांगळे यांनी समाजातील गंभीर समस्येवर उपाय म्हणून पौंगडावस्थेतील मुलांचा भावनिक सामाजिक शिक्षण पध्दतीवर आधारित पौंगडावस्था आणि कौशल्ये (इ.६ वी ते ८ वी) विद्यार्थ्याकरिता कार्यक्रम राबवित आहेत. सदरचा कार्यक्रम हा

एक बहुआयामी व प्रतिबंधात्मक असून त्यादवारे विद्यार्थ्यांमध्ये महत्वाची जीवनाश्यक मूल्ये व सामाजिक भावनिक कौशल्ये रूजवली जातील याकामी अंदाजीत र.रू.९३,०००/- (अक्षरी र.रू.त्र्यान्नव हजार फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्षात येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८५६ विषय क्रमांक – १४

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – पाणीपुरवठा, ब क्षेत्रीय

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/बक्षेका/कावि/३०/२०१९ दि.०६/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे JNNURM अंतर्गत पवना धरणातून से.क्र.२३, जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत थेट पाईपलाईनने पाणी आणणे या प्रकल्पाचे काम हाती घेतले आहे. या कामास मनपा हद्दीबाहेर पवना धरणग्रस्तांनी, स्थानिक शेतक-यांनी, तसेच भारतीय किसान संघ व इतर यांनी मोठ्या प्रमाणात विरोध केलेला आहे. मा.उच्च न्यायालयाने दि.१९/१०/२०१० रोजी सदर जनहित याचिका फेटाळली होती. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, भारतीय किसान संघ व इतर यांनी, मा.मुख्य अभियंता तथा मा.प्राथमिक विवाद निवारण अधिकारी यांनी दि.२७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाचे विरोधात, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) यांचेकडे अपिल केले होते. सदर अपिलाची सुनावणी होऊन, MWRRA ने दि.१६।०५।२०१२ रोजी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार काही निर्देश देऊन पवना धरणातुन थेट पाईपलाईन प्रकल्प राबविणेस मान्यता देऊन, भारतीय किसान संघ व इतर यांचे अपिल फेटाळले आहे. पवना थेट पाईपलाईनचे काम तत्कालीन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे आदेशानुसार जैसे थे परिस्थितीत आहे. त्यामुळे अद्यापही पवना थेट पाईपलाईनचे काम बंद आहे. यासाठी मनपा तर्फे काम चालू करणेबाबत वारंवार पाठपुरावा करणेत आलेला आहे. याबाबत मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३/०१/२०१९ व ०४/०२/२०१९ रोजी बैठक झाली आहे. सदर बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वरच्या भागातील (Up Stream) सिंचनासाठी तसेच बिगर सिंचनासाठी थेट पाईपलाईनने पाणी पुरवठा करणेकामीच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल जलसंपदा विभागाने करावा. तसेच सदर प्रकल्पाचा खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने करावा असे निर्देश देणेत आले आहेत. (याबाबत मा.कक्ष अधिकारी यांचे कडील पत्र क्र.ममुंस/प्रशासन कक्ष/पत्र, जा.क्र.५७/२०१९ दि.११/२/२०१९ व मा.मुख्यामंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.४/२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचा अहवाल इतिवृत्तांताचे अवलोकन होणेकामी सादर.) त्यास अनुसरुन उप कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग पुणे यांचे कडील पत्र क्र.जा.क्र.खपावि/प्रशा-३/२९८७/२०१९ दि.३०/४/२०१९ “सदर प्रकल्पाची मा.मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी दि.३०/०१/२०१९ व ०४/०२/२०१९ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये पवना प्रकल्प सिंचन क्षेत्रास बंदीस्त पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करणेबाबत दिलेल्या सुचनेनुसार सदर प्रकल्पाची

अंदाजित एकूण किंमत कळण्यासाठी व त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी प्रकल्पाचे सखोल सर्वेक्षण, संकलन, अंदाजपत्रक व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे गरजेचे आहे” असे कळवून या कामीचा खर्च र.रु.७९.३० लक्ष निधीची तरतूद करणेकामी विंनती केलेली आहे. मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांचे बैठकीतील निर्देशांप्रमाणे तसेच उप कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, यांचे मागणीस अनुसरुन प्रथमत: सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी र.रु.७९.३० लाखाच्या रकमेची तरतूद असणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकातील पानांक ५०७, अनु.क्र.६/१ नुसार असलेल्या, “पवना धरणातून से.क्र.२३ पर्यंत थेट पाईपलाईन टाकणे,” या कामाच्या तरतूदीमधून विषयांकीत कामाचा खर्च करता येईल. तसेच, सदरचा प्रकल्प महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर आहे. सबब,सदर कामासाठी रक्कम रू.७९.३० लक्ष जलसंपदा विभागास देणेसाठी मा. महापालिका सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. तरी पवना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये पाईपलाईनद्वारे सिंचन व बिगर सिंचनासाठी पाणीपुरवठा करणेच्या प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्पाचे सखोल सर्वेक्षण, संकलन, अंदाजपत्रक तयार करणे या कामी येणा-या खर्चास र.रु.७९.३० लाखास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी तसेच सदरचे काम हद्दीबाहेर असलेने मा. महापालिका सभेची मान्यता मिळणेसाठी तसेच, सदरची रक्कम जलसंपदा विभागास देण्यासाठी सन २०१९-२० या अर्थिक वर्षातील अंदाजपत्रकातील,' पाणीपुरवठा टप्पा-१' या लेखाशिर्षांतर्गत, “पवना धरणातून से.क्र.२३ पर्यंत थेट पाईपलाईन टाकणे,” या कामाच्या तरतूदीमधून (अंदाजपत्रकातील पानांक ५०७, अनु.क्र.६/१, र.रू.३२०.४६ कोटी) सदर कामापोटी र.रु.७९.३० लक्ष अदा करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८५७ विषय क्रमांक – १५

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.माजस/४/१३४/२०१९ दि.०४/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व मा.जिल्हाधिकारी पुणे यांचे. दि.२६/३/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत स्वीप ३ या कर्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आलेली होती. त्यासाठी टेम्पो साउंड सिस्टीम, प्लेक्स, पथनाटयाद्वारे जनजागृती, करण्यात आलेली होती. त्यासाठी येणा-या र.रू.६,६९,९००/- (अक्षरी र.रू.सहा लाख एकोणसत्तर हजार नउशे फक्त) इतक्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८५८ विषय क्रमांक – १६
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचेकडील पत्र क्र.YCMH/भांडार/२/कावि/७३/२०१९ दि.०६/०६/२०१९

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या पॅथोलॉजी विभागाने त्यांच्या विभागासाठी पेन्टा हेड मायक्रोस्कोपची मागणी केलेनुसार सदर उपकरण खरेदी करणेसाठी ई-निविदा सुचना क्र.११/२०१८-१९ (YCMH) अन्वये निविदा प्रसिध्द करुन मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त निविदांमध्ये मे.श्री कंन्स्ट्रक्शन, निगडी यांनी सादर केलेली निविदा एकूण र.रु.६,५०,०००/- (अक्षरी र.रू.सहा लाख पन्नास हजार फक्त) हि लघुत्तम प्राप्त झाली असुन संबंधित दर स्विकृत करण्यात आलेले असुन संबंधित पुरवठाधारक मे.श्री कंन्स्ट्रक्शन, पिंपरी यांना करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने सदर उपकरण खरेदीसाठी होणारा खर्च एकूण र.रु.६,५०,०००/- चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८५९ विषय क्रमांक – १७
दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभां/५/कावि/३५८/२०१९ दि.०७/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे विविध विभागास नव्याने मागणी व वेळोवेळी आवश्यकतेनुसार तसेच मागणीनुसार करावयाची छपाई संदर्भात मे.आशिष एंटरप्रायजेस चिंचवड यांचेशी करण्यात आलेल्या दर करारानुसार छपाई साहित्याचे ई निविदा क्रं.07/2018-19 अन्वये प्राप्त लघुत्तम मंजुर दरानुसार प्रस्तावात नमूद एकुण 40 बाबींसाठी छपाई साहित्याचा पुरवठा एकुण र.रु.61,26,132/- (अक्षरी र.रु.एकसष्ट लाख सव्वीस हजार एकशे बत्तीस फक्त) च्या मर्यादेत मनपा विविध विभागाकडील आवश्यकतेनुसार छपाई करणेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करुन खरेदीस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४८६० विषय क्रमांक – १८

दिनांक – १२/०६/२०१९

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्र.४२३६ दि.२९/०१/२०१९ मधील प्रस्तुत विषयातील कामासाठी मे.भक्ती एंटरप्रायझेस, शिवतेजनगर, चिंचवड स्टेशन, पुणे १९ यांचेकडून २६ जानेवारी २०१९ प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थांना खाऊ म्हणून ब्रिटानिया गुड डे रिच बटर ६६ ग्रॅम बिस्कीटे खरेदी करणेकामी र.रू.८२,७०९/- चे खर्चास मान्यता देणेत आली आहे. तथापि प्रत्यक्षात खर्च र.रू.८५,७०९/- (अक्षरी र.रू.पंच्याऐंशी हजार सातशे नऊ फक्त) झाला असल्याने या रक्कमेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८६१ विषय क्रमांक – १९

दिनांक – १२/०६/२०१९

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राहूल कलाटे

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय व महापालिकेच्या इतर रूग्णालयात रूग्ण उपचाराकरिता दाखल केले जातात. महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील तसेच इतर ग्रामीण भागातून व शहरांमधून रूग्ण उपचाराकरिता येत असतात. त्यामधील बहुतांशी रूग्णांची आर्थिक परिस्थिती बेताची असते, ब-याच रूग्णांचे पिंपरी चिंचवड शहरामद्ये नातेवाईकही नसतात. महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये उपचाराकरिता सामान्य दर आकारले जात असले तरी खूपदा उपचाराचे बील हे रूग्णाचे आर्थिक कुवतीपेक्षा अधिक असते. ही बाब विचारात घेता बहुतांशी रूग्णांची बेताची आर्थिक परिस्थिती व मानवतेच्या दृष्टीकोनातून महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासह मनपाच्या सर्व रूग्णालयात उपचाराकरिता दाखल झालेल्या रूग्णांचा उपचार चालू असताना किंवा रूग्णालयात दाखल असतांना मृत्यु झाल्यास सदर रूग्णाचे मृत्यु समयी असणारे सर्व थकीत बील माफ करणेत यावे. यामुळे सदर मृत रूग्णाचे नातेवाईकांना महापालिकेकडून एक प्रकारे दु:खात मदत होणार असल्याने सदर विषयास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८६२ विषय क्रमांक – २०

दिनांक – १२/०६/२०१९

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

श्री.नागनाथ आण्णा कांबळे रेडिओ मॅकेनिक इलेक्ट्रिशियन यांचे सेवानोंद पुस्तका मधे चुकीची जन्म दिनांक नोंदविण्यात आलेली आहे. त्याबाबत श्री.कांबळे यांनी दि.१२/०८/२०१५, दि.२३/०५/२०१८, दि.१४/०५/२०१९ अन्वये मा.आयुक्त यांचेकडे जन्म दिनांक दुरूस्तीबाबत अर्ज सादर केलेले आहेत. श्री.नागनाथ आण्णा कांबळे यांनी शासननिर्णय व न्यालयीन निर्णयानुसार सादर केलेले कागपत्रांचे अनुषांगाने कागदपत्रांचे अवलोकन करून श्री.कांबळे यांचे सेवानोंद पुस्तकामध्ये योग्य ती जन्म दिनांक दुरूस्ती करणेकामी व योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८६३ विषय क्रमांक – २१

दिनांक – १२/०६/२०१९ विभाग – पाणीपुरवठा जलशुध्दीकरण केंद्र

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.जशुके/पापु/६/६३९/२०१९ दि.१२/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

भामा आसखेड पाणी पुरवठा प्रकल्पग्रस्त शेतक-यांना पुनर्वसनापोटी जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना भामा आसखेड धरणाच्या धरणग्रस्त बाधितांच्या पुनर्वसनासाठी (पुनर्स्थापना खर्चा ऐवजी पुनर्वसन खर्च) अदा करणेचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर केलेला आहे. आता पुणे मनपाने नव्याने र.रु. २० कोटी ( एकूण २०+५ = २५ कोटी ) भामा आसखेड धरण्याच्या बाधितांच्या पुनर्वसनापोटी जिल्हाधिकारी कार्यालयात अदा केलेले आहेत. आता त्याप्रमाणे पि.चि.मनपाने पुनर्वसन खर्चापोटी रक्कम अदा करणेची मागणी होत आहे. सबब पुणे मनपा व पि.चिं.मनपा यांना सदर धरणातील पाण्याच्या आरक्षणाच्या प्रमाणात पि.चिं.मनपानेअदा करावयाची र.रु.१६.७० कोटी इतकी येत आहे. तरी,

१. पुणे महापालिका यांनी दिनांक २२/०५/२०१९ रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भरणा केलेली र.रु. २० कोटी च्या धरतीवर भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मा. जिल्हाधिकारी पुणे यांच्या मागणीनुसार भामा आसखेड प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त खातेदारांना रोख रक्कमेच्या स्वरुपात पुनर्वसनाची रक्कम भरपाई पोटी तुर्तास र.रु.१६.७० कोटी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग करणेस.

२. सदर पुनर्वसन खर्चापोटी प्रकल्पग्रस्त शेतक-यांस आदा करणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकातील सन २०१९-२० पाणीपुरवठा विशेष योजना निधी या लेखाशिर्षा अंतगर्त अंदाजपत्रक १ मधील अ.क्र. १ पान क्र. २६१ वर “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पाण्याचा अतिरिक्त स्त्रोत निश्चित करणे. त्यातील पाणीसाठा आरक्षित करणे व

तदनुषंगिक कामे करणे.” या कामा अंतर्गत पाणी आरक्षणापोटी पाटबंधारे विभागाकडे सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी/ पुनर्वसनाची रक्कम आदा करणे तरतूद र.रु. ३७.५० कोटी. तरतूद यामधून र.रु. १६.७० कोटी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८६४ विषय क्रमांक – २२

दिनांक – १२/०६/२०१९

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

दीपस्तंभ बहुउद्देशीय संस्था ही दिव्यांग, अनाथ, आदिवासी व ग्रामीण क्षेत्रातील, युवक-युवतींसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण व अन्य विविध प्रशिक्षणाचे प्रकल्प व उपक्रम राबविले जातात. अंध, अस्थिव्यंग, मुकबधिर विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजांप्रमाणे मार्गदर्शक, कौन्सिलर, तज्ञ व्यक्ति उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच अभ्यासासाठी संगणक, लॅपटॉप, एंजेल प्लेयर इ. तंत्रज्ञान शिकवून त्यांना उपलब्ध केले जातात. व्यक्तिमत्व विकास, मोबिलीटी, लाईफ स्किल्स शिकविण्यासाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन केले जाते. तसेच दिव्यांगांसाठी सुरु केलेला मनोबल प्रकल्प हा निवासी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी देशातील एकमेव प्रकल्प असून या अंतर्गत अंध, अस्थिव्यंग, कर्णबधिर व १६ वर्षावरील विद्यार्थ्यांना उच्च पदासाठीच्या स्पर्धा परीक्षांचे (UPSC, MPSC, SSC, Bank, Railway etc) प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतून व भारतातील पाच राज्यांमधून १७२ विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. त्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान व प्रशिक्षित मनुष्यबळ संस्थेने विकसित केलेले आहे. मागील वर्षी अल्पना दुबे ही विद्यार्थिनी संपुर्ण अंध असुनही युपी.एस.सी परीक्षा पास होऊन प्रशिक्षण संपवून Asst. Commissioner of Income Tax या पदावर रुजू झाली आहे. रिना बारेला ही आदिवासी विद्यार्थीनी असुन तीला एक हात व एक पाय आहे. ही विद्यार्थिनी मंत्रालयाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन मंत्रालयात उद्योग विभागात कार्यरत आहे. संस्थेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारी प्रांजल पाटील ही विद्यार्थिनी यु.पी.एस.सीतुन आय.ए.एस.झाली आहे व सध्या प्रशिक्षण घेत आहे. अपंग युवकांना सरकारी नोक-यांमध्ये ३% आरक्षण देण्यात आलेले आहे. परंतु विशेषतः अंध मुलांसाठी त्यासंदर्भात तयारी व मार्गदर्शनाची व्यवस्था कुठेही करण्यात आलेली नाही. तसेच अस्थिव्यंग विद्यार्थ्यांनाही त्याबाबत मार्गदर्शना अभावी प्रयत्न करता येत नाही. त्यामुळे अनेकवेळा त्यांच्या जागा रिक्त राहतात. अथवा अत्यंत कमी अपंगत्व असणा-या व्यक्तींनाच त्याचा लाभ होतो. शासनाचे अनाथ मुलांमुलींना शासकीय नोक-यांमध्ये १% जागा आरक्षित केल्या आहेत. परंतु या मुलांसाठी सुध्दा शिक्षण व प्रशिक्षणाच्या आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. याकरिता मनोबल या प्रकल्पामुळे या विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त होऊन त्यांचे जीवनमान उंचावू शकले. त्यांना रोख रक्कमेच्या अथवा वस्तुंच्या मदतीपेक्षाही पायावर उभे राहता येईल व सन्मानाने , आत्मविश्वासाने जगता येईल असे शिक्षण व प्रशिक्षण या प्रकल्पाच्या माध्यमातुन देण्याचा प्रयत्न सुरु आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही औद्योगिक नगरी आहे. देशभरातुन नोकरी, व्यवसाय, शिक्षणाच्या

निमित्ताने लाखो नागरिक या परिसरात येत असतात. महानगरपालिकेने सर्वांसाठी अनेक सुविधा दिल्या आहेत. सर्व घटकांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. दिव्यांग व्यक्तिंसाठीही महानगरपालिकेने पुढाकार घेतलेला आहे, परंतु १६ वर्षावरील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, उद्योजगता विकास, कौशल्य प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास, यासाठी आवश्यक अशा सुविधा मात्र उपलब्ध नाहीत. यामुळे दिव्यांग व्यक्तींचा सर्वांगिण विकास करण्यासाठी येथे खूप वाव आहे. विशेषत: दिव्यांग विद्यार्थ्यांना योग्य सुविधा व प्रशिक्षणाच्या संधी मिळू शकतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात अनाथ, निराधार, युवक-युवतींची संख्या देखील अधिक असुन त्यांच्यासाठी सुध्दा उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध नाही. दीपस्तंभ बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मनोबल हा दिव्यांग, अनाथ व निराधार घटकातील विद्यार्थ्यांसाठीचा प्रकल्प पिंपरी-चिंचवड मनपा परिसरात सुरु झाल्यास ख-या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकेल. या प्रकारचा प्रकल्प सुरु करणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही देशातील पहिला महानगरपालिका असेल. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि दीपस्तंभ बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विदयमाने दिव्यांग, अनाथ व निराधार घटकांसाठी महापालिकेने निश्चित केलेल्या अर्हतेनुसार "मनोबल" हा उपक्रम राबविण्यास सदर उपक्रम जुन २०१९ पासून सुरु करण्याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पिंपळे गुरव मनपा शाळेची (जुनी इमारत) इमारत या उपक्रमाकरिता प्रशिक्षणा करिता आवश्यक सोयी सुविधांसह विनामोबदला उपलब्ध करुन देण्यास तसेच उपक्रम कायम स्वरुपी राहण्याकरिता भविष्यकाळात "सध्याचे पिंपरी न्यायालय अन्यत्र स्थलांतरीत झाल्यानंतर न्यायालयाची रिकामी होणारी इमारत आवश्यक त्या सोई सुविधांसह" ही इमारत या उपक्रमाकरिता विना मोबदला कायम स्वरुपी उपलब्ध करुन देण्यास आणि या उपक्रमांतर्गत दैनंदिन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याकरिता संस्थेच्या समन्वयाने इतर आवश्यक सोयी सुविधा वेळोवेळी मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेने देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ नियम १ (के) अंतर्गत पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८६५ विषय क्रमांक – २३

दिनांक – १२/०६/२०१९

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१०६ मध्ये ऐनवेळेचा विषय म्हणून करसंकलन विभागाकडील विषय क्र.४९ ठराव क्र.४५६० दि.२८/२/२०१९ यास मंजुरी मिळाली आहे. सदर ठरावातील "मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा" हा मजकूर वगळण्यात यावा व त्याऐवजी फक्त "मान्यता देणेत येत" आहे हा मजकुर नमुद करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत

कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८६६ विषय क्रमांक – २४

दिनांक – १२/०६/२०१९

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.संतोष लोंढे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया येथील महापौर यांनी दिनांक ०७ ते १० जुलै २०१९ या कालावधीत जगातील १०० शहरांच्या महापौरांना कार्यक्रमासाठी निमंत्रित केलेले आहे सदर आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये १०० शहरांचे १००० पेक्षा जास्त प्रतिनिधी सहभाग घेणार असल्याने सदर परिषदेमध्ये जागतिक दर्जाचे वक्ते नेटवर्किंगमधल्या संधी तसेच ध्येयनिष्ठ व्यवसाय कार्यक्रम आखून शहरे गतिमान बनविने शहरांची स्थिरता गतीशिलता, नवनिर्माण करण्याची क्षमता या बद्दल मार्गदर्शन करणार असून महानगर निर्मितीच्या अभ्यासाच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड शहराला त्याचा फायदा होणार आहे. या दृष्टीने मुळ पत्रात नमुद केल्याप्रमाणे परिपुर्ण विकासाचा टप्पा गाठत असलेल्या पिंपरी चिंचवड शहराचे प्रतिनिधित्व करणे, स्पॉन्सरशिपच्या संधीतून शहराला/ महापालिकेला उपयोग करून घेणे आणि नविन पार्टनरशिप आणि कोलॅबरेशन शहरात प्रस्तापित करणे यासाठी सदर परिषदेमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड शहरातील भविष्य काळातील विकासकामे आणि सुविधांच्या दृष्टीने वरील निमंत्रणानुसार शहराच्या वतीने मा.महापौर यांना उपस्थीत रहावयाचे असल्याने मे. व्हिजन हॉलिडेज्, प्राधिकरण, निगडी, पुणे-४११ ०४४ यांचे मार्फत सदर दौ-यांचे नियोजन करण्यास दि.०७ ते १० जुलै, २०१९ या कालावधीत मा.महापौर यांचा व्हिसा, विमान प्रवास, निवास, नाष्टा, भोजन, स्थानिक प्रवास व इतर अनुषंगिक बाबींकामी पॅकेज टूर स्वरूपात दौ-यांचे आयोजन करणेकामी त्यांनी सादर केल्याप्रमाणे सर्व करांसह र.रु.४.८०,०००/- (अक्षरी र.रु. चार लाख ऐंशी हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८६७ विषय क्रमांक – २५

दिनांक – १२/०६/२०१९

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव -

विषय - लिपिक पदावरील नियुक्ती रद्द करून गट ड च्या मुळ पदावर पदावनत करून खातेनिहाय चौकशी सुरू केलेल्या कर्मचा-यांचा अपिल अर्ज.

विषय क्र.२५ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.२५ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ४८६८ विषय क्रमांक – २६

दिनांक – १२/०६/२०१९

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव -

विषय - श्री.गणेश धोंडिबा राऊत, कनिष्ठ अभियंता (वि) यांचा अपिल अर्ज.

विषय क्र.२६ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.२६ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(मडिगेरी विलास हनुमंतराव)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/५९५/२०१९
दिनांक – १३/०६/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.